# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
### कंत्राटी (तदर्थ) वैद्यकिय अधिकारी गट-अ यांची पदभरती जि. सातारा

मा. संचालक, आरोग्य सेवा, संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. संआसे/कक्ष-२अ/टेक्रं.५/अवैगटअ/पदभरती/२१५८-६६/१८, दिनांक ०४.१०.२०१८ पत्राअन्वये सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत **निव्वळ कंत्राटी स्वरुपात (एकत्रित मानधनावर) ११ महिने कालावधीकरिता** सातारा जिल्हयातील जिल्हा रुग्णालय/उपजिल्हा/ग्रामीण या ठिकाणी रिक्त पदांवर खाली नमुद केलेनुसार तदर्थ (कंत्राटी) वैद्यकिय अधिकारी गट-अ यांची नेमणूक करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी गट-अ | एमबीबीएस व पदव्युत्तर पदवी/पदविका (विशेषज्ञ) | आदिवासी व दुर्गत भाग रु.९००००/-<br>इतर भागात रु.८५०००/- |
| २ | वैद्यकिय अधिकारी गट-अ | एमबीबीएस | आदिवासी व दुर्गत भाग रु.८००००/-<br>इतर भागात रु.७५०००/- |

| पदनाम | जिल्हा रुग्णालय सातारा व अधिनस्त उपजिल्हा/ ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे |
|---|---|
| वैद्यकिय अधिकारी (एमबीबीएस अर्हताधारक) | ६ |
| वैद्यकिय अधिकारी (विशेषज्ञ/एमबीबीएस अर्हताधारक) | २९ |

**अटी व शर्ती:-**

१) कंत्राटी वैद्यकिय अधिकारी हे शासकिय नियमित कर्मचा-यांप्रमाणे कोणतेही फायदे मिळण्यास पात्र असणार नाहीत.

२) उपलब्ध रिक्त पदांची संख्या लक्षात घेऊन पदव्युत्तर अर्हताधारकांना प्राधान्य देण्यात येईल.

३) कंत्राटी वैद्यकिय अधिका-यांची सेवा खालील कारणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

i) दोन दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर.

ii) कामाध्ये निष्काळजीपणा.

iii) बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी न लावणे.

iv) कामकाज अकार्यक्षम असणे /सेवेची कर्तव्य व जबाबदा-या कटाक्षाने न पाळल्यास.

v) गैरवर्तन / गैरव्यवहार केल्याचे निर्दशनास येणे.

vi) कार्यरत पदावर नियमित वैद्यकिय अधिका-यांची नियुक्ती झाल्यास.

४) ज्या रिक्त ठिकाणी एमबीबीएस /पदव्युत्तर पदवी/पदविका (विशेषज्ञ) धारक उपलब्ध होणार नाहीत त्याठिकाणी एमबीबीएस अर्हताधारकांना नियुक्ती देण्यात येईल. परंतु याठिकाणी तद्नंतर पदव्युत्तर पदवी/पदविका (विशेषधारक) उपलब्ध झाल्यास, एमबीबीएस धारकांची सदरील नियुक्ती रद्द करण्यात येईल.

५) अर्ज करणा-या उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

६) निवड झालेल्या वैद्यकिय अधिका-यांनी नियुक्तीच्या मुख्यालयी राहणे बंधनकारक असेल तसेच बायोमेट्रीक हजेरीप्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य राहील.

७) निवड झालेले वैद्यकिय अधिकारी १ महिन्यांची आगाऊ सूचना जिल्हाशल्यचिकित्सक यांना देऊन कार्यमुक्त होऊ शकतील.

८) खालील कारणास्तव कार्यमुक्त झालेल्या वैद्यकिय अधिका-यांना पुन्हा नियुक्ती मिळणार नाही.

i) कंत्राटी म्हणून नियुक्ती मिळाल्यानतंर नियुक्तीचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी परवानगी न घेता गैरहजर असलेले व कंत्राटी सेवा सोडून गेलेले वैद्यकिय अधिकारी.

ii) शासन सेवेत ५८ वर्षे सेवा पूर्ण करुन सेवानिवृत्त झालेले वैद्यकिय अधिकारी.

iii) शिस्तभंगाच्या कारणास्तव सेवा समाप्त केलेले वैद्यकिय अधिकारी.

iv) अनाधिकृत गैरहजर असलेले व शासन सेवेतून काढून टाकलेले व संपामध्ये भाग घेतलेले वैद्यकिय अधिकारी.

९) नियमित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केलेल्या वैद्यकिय अधिका-यांची सेवा समाप्त करताना जो वैद्यकिय अधिकारी त्याठिकाणी शेवटी रुजू झालेला आहे.त्यांची सेवा प्रथम समाप्त करण्यात येईल व इतर ठिकाणी रिक्त पद असलेस त्या ठिकाणी नियुक्ती देणेबाबत प्राधान्य दिले जाईल.

१०) वैद्यकिय अधिका-याकडून त्यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात अधिकार सांगणार नाही. व त्यासाठी तसेच अन्य मांगण्यासाठी आंदोलन/संप/बंद इत्यादी करणार नाही व त्यात भाग घेणार नाही अशा आशयाचे बंधपत्र रु. १००/च्या स्टॅम्प पेपरवर घेण्यात यावे.

११) या सेवा कंत्राटी पध्दतीच्या असल्याने त्याबाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

१२) शासन सेवा शर्तीखाली ही सेवा नसल्याने त्या अनुंषगाने मिळणारे निवृत्तीवेतन,विमा योजना,भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

१३) वरील पदांसाठी अर्ज सोबतच्या नमुन्याप्रमाणे लिहून पासपोर्ट साईज फोटो चिकटवून सोबत शैक्षणिक अर्हता, गुणपत्रिका व प्रमाणपत्रांसह (पदवी/पदविका, पासिंग व अटेम्ट) जात पडताळणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला (शाळा सोडल्याचा दाखला), मोबाईल क्रमांक, आधार दाखला, महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल रजिस्ट्रेशन,रिनीवल (नुतनीकरण), एमएससीआयटी इत्यादी प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती जोडून अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

१४) प्रस्तूत अटी व शर्ती मध्ये वेळोवेळी बदल करण्याचे अधिकार समितीकडे राखीव राहतील. जाहिरात प्रसिध्द झालेपासून ७ दिवसात जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय, सातारा यांचे कार्यालयात अर्ज सादर करावेत.

१५) सध्या दर्शविण्यात आलेली रिक्त पदे या व्यतिरिक्त यापुढे रिक्त होणारी पदे अथवा गैरहजर वैद्यकिय अधिकारी यानुसार आवश्यकतेप्रमाणे वेळोवळी पदे भरणेत येतील.

१६) यापुढे रिक्त होणा-या पदांसाठी वेळोवेळी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार नाही. तसेच जाहिरात प्रसिध्द झालेपासून पदे पूर्ण भरेपर्यंत सदर जाहितरात ग्राहय धरण्यात येतील यांची नोंद घ्यावी.

१७) नियुक्ती आरोग्य सेवेची निकड लक्षात घेवून गरजेच्या ठिकाणीच देण्यात येईल.

१८) नियुक्ती संपुष्टात आल्यास पुर्ननियुक्ती देण्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

१९) सोबतच्या अर्जाच्या नमुन्यात अर्ज सादर करावा.

सदस्य सचिव तथा
जिल्हा शल्यचिकित्सक, सातारा

टीपः- सदर भरती प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकारी समितीकडे राखीव राहतील.

# अर्जाचा नमुना

अर्जाचा नोंदणी क्रमांकः-

| |
|---|
| पासपोर्ट साईज फोटो |

प्रति,
मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा

## कंत्राटी वैद्यकिय अधिकारी या पदासाठी अर्ज

१. संपूर्ण नावः- (आडनाव प्रथम)........................................................

२. जन्मतारीख (शालांत प्रमाणपत्रानुसार)

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

३. अर्ज करतेवळी पूर्ण वयः-
वयाचा दाखला शाळा सोडल्याचा दाखला

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

४. संपूर्ण पत्ता :-..........................................................................
..........................................................................

५. उमेदवाराचे नागरिकत्व : महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय ?

६. अर्जदार कोणत्या जातीचा व प्रवर्गाचा आहे. जात पडताळणी प्रमाणपत्र

७. शैक्षणिक पात्रता :- पदवी/पदविका पासिंग व अटेम्ट प्रमाणपत्र :-

| उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशिल | विद्यापिठाचे नाव परिक्षामंडळाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | घलेले विषय | एकूण गुण व टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

८. इतर अर्हता एमएससीआयटी :-

९. महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल रजिस्ट्रेशन :-

१०.कामाचा अनुभव :-

| कार्यालयाचा नाव व पत्ता | धारण केलेले पद | सेवा कालावधी पासून पर्यंत | कार्यालय/ शासकिय खाजगी आहे काय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

सोबत जोडलेली कागदपत्रे :-

स्थळ :-

दिनांक :-

उमेदवाराची सही